# हॉबी होम संदर्भात वारंवार विचारले जाणारे प्रश्न

## (१) वयोगटा संबंधीत काही प्रश्न

प्रश्न १) हॉबी होम मधील मुले ही ६ ते ७ व ७ ते ८ वयोगटातीलच असायला हवी हा महत्वाचा निकष आहे काय ? ३ ते ५ अथवा ८ च्या पुढील वयोगटातील मुले या मध्ये भाग का घेऊ शकत नाहीत ?

उत्तर – होय, वयोगट हा या पूर्ण प्रकल्पामधील अत्यंत महत्वाचा निकष आहे. या संपूर्ण प्रकल्पाची आखणी ही मुलांच्या मज्जासंस्थेच्या विकासाच्या काही मूलभूत शास्त्रीय संकल्पनांवर आधारित आहे. या प्रकल्पाच्या अंतर्गत राबविल्या जाणा-या विविध उपक्रमांमधून होणारा मुलांच्या बहुविध बुध्दिमत्तांचा विकास हा एका विशिष्ट वयातच होत असल्याने ६ ते ७ व ७ ते ८ हा निकष अत्यंत महत्वाचा आहे.

प्रश्न २) हॉबी होम हे फक्त ६ ते ७ व ७ ते ८ वयोगटातील मुलांसाठीच मर्यादीत असणार आहे काय ?

उत्तर - सुरवातीला आपण फक्त ६ ते ७ व ७ ते ८ वयोगटासाठीच हा प्रकल्प सुरु करीत आहोत. कालांतराने वय वर्षे ६ आधीच्या व वय वर्षे ८ नंतरच्या मुलांसाठीही वेगळया उपक्रमांची आखणी करण्यात येईल.

प्रश्न ३) ६ ते ७ वयोगटातील मुलगा/मुलगी त्या वयोगटाचे क्रेडीट्स पूर्ण केल्यानंतर ७ ते ८ वयोगटासाठी प्रवेश घेऊ शकतो / शकते काय ?

उत्तर - होय ६ ते ७ वयोगटाचे क्रेडीट्स पूर्ण केलेला मुलगा/मुलगी ७ ते ८ वयोगटासाठी प्रवेश घेऊ शकेल.

## (२) हॉबी होम बॅच संदर्भातील काही प्रश्न

प्रश्न १) हॉबी होमच्या एका बॅच मध्ये जास्तीत जास्त किती मुले असावीत ?

उत्तर - हॉबी होमच्या एका बॅच मध्ये जास्तीत जास्त फक्त १० मुले असावीत.

प्रश्न २) एक बॅच ही फक्त १० मुलांचीच असायला हवी काय ?

उत्तर – हॉबी होम प्रकल्पाची आखणी ही मुलांच्या शिक्षणा संबंधातील काही मूलभूत शास्त्रीय आधारांवर केली आहे. या प्रकल्पाचे स्वरुप कुठल्याही प्रकारे ‘शिकवणी’ चे नाही. या प्रकल्पामधील विविध उपक्रम हे प्रत्येक मुलाच्या बहुविध बुध्दिमत्तांचा विकास करण्याच्या दृष्टीने आखले गेले आहेत. यामुळे हॉबी होमच्या ताई-दादांचे प्रत्येक मुलाकडे ‘व्यक्तिविशिष्ट’ (Personalised) दृष्टीकोनातून लक्ष असणे आवश्यक आहे. तसेच यातील अनेक उपक्रम हे एका विशिष्ट संख्येच्या गटांमधेच राबवणे आवश्यक असल्याने, एका बॅचमधे १० पेक्षा जास्त मुले असणे हे प्रकल्पाच्या उद्दीष्टांना पूरक असणार नाही.

प्रश्न ३) १० पेक्षा अधिक मुले आल्यास काय करावे ?

उत्तर – १० पेक्षा अधिक मुले आल्यास ताई-दादांनी एका पेक्षा अधिक बॅचेस तयार कराव्यात.

## (३) प्रमाणपत्र व मूल्यमापना संदर्भातील काही प्रश्न

प्रश्न १) प्रत्येक मुलाला प्रमाणपत्र दिले जाईल काय ?

उत्तर - प्रत्येक मुलाला एक व्यक्तिविशिष्ट (Personalised) प्रमाणपत्र दिले जाणार आहे. प्रत्येक मुलाच्या मूल्यमापन पत्रिकेवर आधारित प्रत्येक क्रेडिटच्या अखेरीस हे प्रमाणपत्र दिले जाईल.

प्रश्न २) हॉबी होमसाठी प्रमाणपत्र असेल काय ? तसेच हॉबी होम व ताई दादांचे मूल्यमापन होणार काय ?

उत्तर – होय, हॉबी होमसाठी प्रमाणपत्र असणार आहे. हॉबी होमच्या संबंधित अधिकृत प्रशिक्षण केंद्राशी (ATC) संलग्नता दर्शविणारे एम.के.सी.एल. चे हे अधिकृत प्रमाणपत्र असेल. या संदर्भातील मूल्यमापनासाठी जिल्हा स्तरावरील तज्ज्ञ हे प्रत्येक हॉबी होमला प्रत्येक महिन्यात भेट देतील. या तज्ज्ञांनी ताई-दादांशी वेळोवेळी केलेला संवाद, चर्चा तसेच ताई / दादांचा अंतरिम प्रशिक्षण सत्रातील सहभाग या आधारे हॉबी होमचे तसेच ताई-दादांचे मूल्यमापन केले जाईल.

प्रश्न ३) प्रत्येक ताई / दादाला प्रमाणपत्र दिले जाईल काय ?

उत्तर – होय, प्रत्येक ताई / दादाला प्रमाणपत्र दिले जाईल.

प्रश्न ४) ताई / दादांसाठी अंतरिम प्रशिक्षणाची सोय आहे काय ?

उत्तर - होय ताई-दादांची ज्ञानसंपदा विकसित ठेवण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एम.के.सी.एल.) च्या Distributed Classroom च्या माध्यमातून अंतरिम प्रशिक्षणाची सोय केली आहे. Distributed Classroom च्या माध्यामातून होणा-या सत्रांमधे ताई-दादांना तज्ज्ञांशी सल्ला-मसलत करता येईल तसेच त्यांच्या विविध शंकांचे निरसनही करुन घेता येईल.

## (४) पालक समुपदेशना संबंधातील काही प्रश्न

प्रश्न १) पालकांचे समुपदेशन कसे करावे ?

उत्तर - एम.के.सी.एल. तर्फे आपल्याला पालकांच्या समुपदेशना संबंधातील प्रेझेंटेशन, माहिती पुस्तिका व VCD असणारा एक संच दिला जाईल तसेच हॉबी होमच्या राज्यव्यापी होणा-या जाहिराती हा ही पालक समुपदेशनाचाच एक भाग आहे.

प्रश्न २) हॉबी होम प्रकल्पामधील पालकांची भूमिका काय ?

उत्तर – हॉबी होममुळे पालकांना त्याच्या पाल्याच्या बहुविध बुध्दिमत्तांचा विकास करण्याची संधी मिळेल. पालक, हॉबी होम व पाल्य यातील मध्यस्थ म्हणून नक्कीच एक चांगली भूमिका पार पाडू शकतील. मुलांच्या बहुविध बुध्दिमत्तांचा विकास करणारे अनुभव, पालक आपल्या मुलांना घरातही देऊ शकतील तसेच ताई / दादांशी सतत संपर्कात राहून संवाद साधल्यास पालकांना आपल्या मुलाच्या विकासाची योग्य दिशा कळण्यास निश्चित मदत होईल.

## (५) मुलांच्या प्रवेशासंदर्भातील काही प्रश्न

प्रश्न १) मुलाला हॉबी होम मध्ये प्रवेश देण्याआधी त्याची जन्मतारीख तपासून घेणे आवश्यक आहे काय ?

उत्तर - होय मुलाला हॉबी होम मध्ये प्रवेश देण्याआधी त्याची जन्मतारीख तपासून घेणे आवश्यक आहे. या करिता मुलाच्या जन्मतारखेचा दाखला तपासून घेता येईल.

प्रश्न २) हॉबी होम रविवारी चालविता येईल काय ?

उत्तर – तुम्ही हा उपक्रम आठवड्यातून तीन दिवस चालवू शकता. मुलांनी या प्रकल्पाच्या विविध उपक्रमांमधून आनंद घेणे हा हॉबी होम चा एक उद्देश असल्याने रविवारी हॉबी होमचे उपक्रम न घेणे हे जास्त श्रेयस्कर आहे.

प्रश्न ३) हॉबी होमचे उपक्रम चालविण्यासाठी ताई-दादा त्यांच्या सोईनुसार आठवड्यातील दिवस निवडू शकतील काय ?

उत्तर – हॉबी होमचे उपक्रम चालविण्यासाठी दिवस निवडताना ताई-दादांनी स्वत:च्या सोयीपेक्षा मुलांच्या सोयीला प्राधान्य द्यावे.

प्रश्न ४) मुलांच्या शाळेच्या वेळांचा विचार करुन ताई-दादा बॅचेस ठरवू शकतात का ?
उत्तर - होय मुलांच्या शाळेच्या वेळांचा विचार करुन ताई-दादा बॅचेस ठरवू शकतात.

## (६) मार्केटिंग संदर्भातील काही प्रश्न

प्रश्न १) हॉबी होमसाठी मुलांचा प्रतिसाद मिळवण्यासाठी काय योजना आहे ?
उत्तर - हॉबी होमसाठी समाजातून प्रतिसाद मिळवण्याच्या दृष्टीने एम.के.सी.एल. केंद्रीय स्तरावरुन एक राज्यव्यापी जाहिरात मोहीम राबवेल तसेच एम.के.सी.एल. ची स्थानिक स्तरावरील केंद्रे, ही सुध्दा ताई-दादांना स्थानिक पातळीवर हॉबी होमचे मार्केटिंग करण्यास मदत करतील.

## (७) ATC संबंधातील काही प्रश्न

प्रश्न १) या प्रकल्पात संलग्न असलेल्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राची (ATC) भूमिका काय असेल ?
उत्तर - या प्रकल्पामधे ATC तर्फे विविध पातळयांवर विविध भूमिका पार पाडल्या जातील. प्रवेश, मूल्यमापन, प्रशिक्षण अशा विविध कारणांसाठी तंत्रज्ञानाधिष्ठित विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.

ATC च्या सहाय्याने उपलब्ध होणा-या सुविधा :-

- तंत्रज्ञान / सॉफ्टवेअर प्रणाली सुविधा
- ऑनलाईन मूल्यमापन प्रणाली
- डिस्ट्रीब्युटेड क्लासरुम
- ऑनलाईन व्यवस्थापकीय प्रणाली
- स्थानिक पातळीवर जाहिरात व मार्केटिंग सहाय्य
- हॉबी होमचे व्यवस्थापन, समन्वयन व नेटवर्किंग

## (८) हॉबी होमच्या शुल्का संदर्भातील काही प्रश्न

प्रश्न १) हॉबी होमचे एकूण शुल्क किती आहे ?
उत्तर - हॉबी होमचे प्रत्येक मुलासाठी दरमहा शुल्क रु.१५०/- तर एकूण प्रकल्पासाठी रु.१३५०/- (एकरकमी भरल्यास) इतके आहे. दोन हप्त्यात हे शुल्क भरल्यास शुल्काचा पहिला हप्ता रु.१०००/- तर दुसरा हप्ता रु.५००/-इतका असेल.

प्रश्न २) शुल्क जमा कसे करावे ?
उत्तर – हॉबी होममध्ये प्रवेश घेऊ इच्छिणा-या मुलांचे पालक ताई / दादा कडे वार्षिक शुल्क जमा करतील. नाव नोंदणीच्या वेळी संपूर्ण शुल्क जमा करणे आवश्यक आहे.

प्रश्न ३) आर्थिक दृष्ट्या दुर्बल स्तरांवरील मुलांना हॉबी होमचा आनंद घेता यावा म्हणून काही तरतूद आहे काय ?
उत्तर – या संबंधात हॉबी होमचे ताई-दादा व महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एम.के.सी.एल.) समाजातील विविध व्यक्तींना तसेच संस्थांना (स्वयंसेवी संस्था / क्लब्स / पालक) या मुलांना मदत करण्याचे आवाहन करु शकतात. हॉबी होमच्या शुल्क रकमेचा काही टक्के निधी या संस्थांच्या मदतीने उभा करता येईल. यासाठी स्थानिक स्तरावर हॉबी होम संचालकांनी एम.के.सी.एल. च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राच्या सहकार्याने संपर्क साधावेत.

प्रश्न ४)  हॉबी होमचा शेअर पॅटर्न कसा आहे
उत्तर -

| | |
|---|---|
| हॉबी होम (ताई दादा) चा शेअर | मुलाच्या शुल्क रकमेच्या ५० % |
| ATC शेअर | मुलाच्या शुल्क रकमेच्या १० % |
| एम.के.सी.एल. चॅनल पार्टनर्स व ग्राममंगलचा शेअर | मुलाच्या शुल्क रकमेच्या ४० % |

प्रश्न ५)  हॉबी होमचा शेअर केव्हा दिला जाईल ?
उत्तर -  पहिले क्रेडिट पूर्ण केल्यानंतर हॉबी होमचा शेअर दिला जाईल.